Savitribai Phule Shikshan Prasarak Mandal's

# N B NAVALE SINHGAD COLLEGE OF ENGINEERING

*(Approved by AICTE & Affiliated to Solapur University, Solapur)*

Opp. Solapur University, Solapur – Pune National Highway, Kegaon, Solapur. 413255, (MH), India.

**Prof. M. N. Navale** M. E. (Elect.), MIE, MBA CHAIRMAN

**Mr. Rohit Navale** M. E. (Mech. Engg.) GENERAL SECRETARY

**Dr. S. D. Nawale** M. Tech., Ph. D. (E&TC Engg.),PDF (France) PRINCIPAL

**दि.11/02/2025**

**शै. वर्ष 2024-25 या शैक्षणिक वर्षापासून सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (एसईबीसी) प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र बंधनकारक करणेबाबत नोटीस...**

**संदर्भ:-** शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-2024/प्र.क्र. 75 **(भाग-1)** /आरक्षण-5
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -400032
दिनांक-29 जानेवारी, 2025.

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये शै. वर्ष 2024-25 मध्ये प्रवेश घेतलेल्या बी-टेक प्रथम वर्ष ते बी-टेक अंतिम वर्षातील **सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (एसईबीसी) प्रवर्गामधून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी** शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आलेले आहे.

शै. वर्ष 2024-25 पासून **सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (एसईबीसी) प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी** असलेली शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक 29 जानेवारी, 2025 रोजीच्या शासन निर्णयान्वये उत्पन्नाची अट रद्द करण्यात आलेली असून आता त्याऐवजी नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. याची वरील एसईबीसी प्रवर्गातील शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता पात्र असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.

N. B. Navale Sinhgad College of Engineering Solapur 413 255

डॉ. एस. डी. नवले
प्राचार्य

**सोबत: शासन निर्णयाची प्रत.**

[School Section]

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील (एसईबीसी) विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र बंधनकारक करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण-२०२४/प्र.क्र. ७५ (भाग-१)/आरक्षण-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक - २९ जानेवारी , २०२५

संदर्भ-

१. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरीता आरक्षण अधिनियम, २०२४, दि.२६.०२.२०२४
२. समक्रमांकाचे शासन परिपत्रक दि.११.०३.२०२४, ०५.०७.२०२४
३. समक्रमांकाचे शासन शुद्धीपत्रक दि.१५.०३.२०२४, २८.०६.२०२४
४. शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र.सारथी २०२०/प्र.क्र.३५ (भाग-२)/महामंडळे, दि.१४.०९.२०२०
५. शासन शुद्धीपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र.शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण-१, दिनांक २०.०९.२०२४

प्रस्तावना -

राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण (एसईबीसी) अधिनियम, २०२४ संदर्भ क्र. १ येथील अधिनियमान्वये राज्यात अंमलात आला असून याअन्वये राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील व पदांवरील सरळसेवांमधील नियुक्तीसाठी व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी १० टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले आहे. संदर्भ क्र.२ व ३ अन्वये महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरीता आरक्षण अधिनियम, २०२४ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने द्यावयाचे जात प्रमाणपत्र आणि नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये इतर मागास बहुजन कल्याण विभागाने राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरू असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती , इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द केली असून

Scholarship Section
-Pl. inform to all the students & do the needful

त्याऐवजी नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक केले आहे. या तरतूदीच्या धर्तीवर राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठीही सदर तरतूद लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय-**

सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरू असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द करण्यात येत असून नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२५०१२९१३३८५५४६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRASHANT SURESH WAMAN

Digitally signed by PRASHANT SURESH WAMAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=f548550a634d80db515aa095c3a0b16818564d694beaef33344 5172eb1cc1b35, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F5D1BED3B1AFB58C99263D88032426C4AC12B7FF92A2 3D5D44AE3B7A535C602F, cn=PRASHANT SURESH WAMAN
Date: 2025.01.29 13:40:13 +05'30'

(प्रशांत वामन)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स./प्र.स./सचिव,मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
६) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य/संसद सदस्य
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
८) अपर मुख्य सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०)अपर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) सचिव, वैद्यकीय शिक्षण वऔषधी द्रव्ये विभाग, जी.टी. हॉस्पिटल, मुंबई.
१६) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-
१७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८) मुख्य महानगर दंडाधिकारी,
१९) सर्व विभागीय आयुक्त.
२०) सर्व जिल्हाधिकारी,
२१) सर्व उप विभागीय दंडाधिकारी (महसूल) तथा उप विभागीय अधिकारी,
२२) सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
२३) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२४) महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
२५) संचालक, विजाभज संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२६) संचालक, उच्च तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२७) संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२८) संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२९) सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे,
३०) सर्व मंत्रालयीन विभाग त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात,
३१) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग/सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण
३२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३३) सर्व जिल्हा परिषदाचे समाजकल्याण अधिकारी
३४) सर्व अध्यक्ष/सदस्य सचिव, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
३५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३६) निवड नस्ती, आरक्षण-५